# जाहिरात

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत नैसर्गिक साधन संपत्ती व्यवस्थापन समन्वयक (NRM Coordinator) यांची मानधन तत्वावर निवड करणेसाठीची जाहिरात

महाराष्ट्र शासन आणि जागतिक बँक अर्थसहाय्यीत नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत गाव अनुकूल आराखडयातील ( VAP ) प्रस्तावित NRM कामाविषयी गावस्तरावर व्यापक जागरुकता निर्माण करणे आणि मृद व जल संधारण कामांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सामाजिक चळवळ उभी करणे या करीता भंडारा व साकोली उपविभागस्तरावर नैसर्गिक साधन संपत्ती व्यवस्थापन समन्वयक (NRM Coordinator ) या पदाकरीता मानधन तत्वावर ११ महिन्यांसाठी निवड करण्यासाठी सदर योजनेच्या मार्गदर्शक सूचनेतील अटी व शर्ती नुसार बंद लिफाफ्यातून आवश्यक सर्व शैक्षणिक कागदपत्र व अनुभव प्रमाणपत्रासह अर्ज मागविण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| पदनाम | नैसर्गिक साधन संपत्ती व्यवस्थापन समन्वयक (NRM Coordinator) |
| पद संख्या | एकुण ४ पदे (नागपूर/ काटोल / रामटेक / उमरेड प्रती उपविभागस्तर १) |
| शैक्षणिक अर्हता | १. किमान समाज कार्य विषयातील पदवी (BSW) अथवा समाज कार्य विषयातील पदव्युत्तर पदवी (MSW)<br>२. अतिरिक्त शैक्षणिक अर्हता मान्यता प्राप्त कृषी विद्यापिठाची कृषी विषयाची पदवी अथवा पदविका |
| निवडीचे निकष | १. नैसर्गिक साधन संपत्ती NRM / पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन बाबत शासकीय / निमशासकीय/अशासकीय /स्वंयसेवी संस्था यांचे समवेत काम करण्याबाबतचा किमान ३ वर्षाचा अनुभव.<br>२. उमेदवाराचे वय १ डिसेंबर २०२५ रोजी ५० वर्ष किंवा त्यापेक्षा कमी असावे.<br>३. मृद व जलसंधारण कामाविषयी मूलभूत माहिती असणे आवश्यक आहे. वेगवेगळ्या प्रकारच्या मृदा, पाणी साठवण संरचना, धूप नियंत्रण इत्यादी विषयांची मूलभूत तांत्रिक माहिती असणे आवश्यक.<br>४. समुदाय संघटन आणि सामाजिक जाणीव जागृती प्रक्रियेचे साधने व तंत्र यांचे ज्ञान व वापराचा अनुभव आवश्यक.<br>५. गावकऱ्यांना मृद व जलसंधारण कामात सहभागी करण्यासाठी प्रेरित करण्याची क्षमता असावी.<br>६. लोकांशी प्रभावीपणे संवाद साधण्याची क्षमता असावी. |
| पदाच्या जबाबदाऱ्या | NRM कामाविषयी गावस्तरावर माहिती देणे व जागरुकता निर्माण करणे. मृद व जलसंधारण कामांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सामाजिक चळवळ उभी करणे, गाव पातळीवर नाविन्यपूर्ण ( उदा. जलदिंडी, मेळावे, विविध स्पर्धा इ.) विशेष उपक्रम राबवून लोकसहभाग वाढविणे, मृद व जलसंधारण कामांचे महत्त्व पटवून देणे, पाण्याच्या ताळेबंदावर आधारित पीकपध्दती अवलंबिणे बाबत जनजागृती करणे, गावस्तरावर ग्राम कृषि विकास समिती बैठक व ग्राम सभेमध्ये उपस्थित राहून गाव अनुकूलन आराखडा, पाण्याचा ताळेबंद समजावून सांगणे तसेच आराखडा अंमलबजावणी प्रगती व पुढील नियोजन याबाबत चर्चा करणे, प्रकल्पामधील अधिकारी यांच्या क्षेत्रीय भेटी वेळी उपस्थित राहणे, NRM संदर्भातील पूर्ण झालेल्या कामांमुळे झालेल्या सकारात्मक बदलांना अनुसरुन यशोगाथा तयार करणे, प्रकल्पातील वरिष्ठ अधिकारी यांचे मार्फत वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सुचनांचे पालन करणे, महिन्यातील किमान १५ दिवस क्षेत्रीय भेटी देणे बंधनकारक राहील. |
| कालावधी व मानधन | ११ महिने मानधन तत्वावर.<br>३००००/- रु. प्रतिमाह प्रवास खर्चासह. |
| अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक | २६ डिसेंबर २०२५ |
| अर्ज सादर करण्यासाठी पत्ता | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, कदिमबाग नर्सरी, सिव्हिल लाईन, नागपूर - ४४०००१ |

सदर नेमणूक फक्त ११ महिने कालावधीसाठी मानधन तत्वावर असून कायमस्वरुपी नाही. प्रकल्पाच्या आवश्यकतेनुसार सदरचा कालावधी कमी किंवा अधिक करण्याचे व काम असमाधानकारक असल्यास उमेदवाराला कामावरुन कमी करण्याचे अधिकार प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

सदर पदाकरीता अर्जाचा नमूना जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, कदमबाग नर्सरी, सिव्हिल लाईन, नागपूर येथे उपलब्ध आहे.

**ठिकाण - नागपूर**
**दिनांक - १७ डिसेंबर २०२५**

**स्वाक्षरी/-**
**(रविंद्र ज्यो. मनोहरे)**
**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, नागपूर**

**क्र. संमावज/नाग/731/2025**

Mahabharti.in